क्रमांक : पोआअ/प्रबंधक शाखा/फ्रिज खरेदी-दरपत्रके/ 10875 /२०१७ अमरावती शहर दिनांक ४/९/२०१७

- 4 SEP 2017

**विषय :-** पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर यांचे कार्यालयाकरीता १९० लिटर क्षमतेचा ब्रन्डेड कंपनीचा फ्रिज (बजाज/व्हिडीओकॉन/एलजी/सॅमसंग/वरुफुल /केलव्हिनेटर ) यापैकी एक खरेदी करावयाचा असल्याने त्याबाबतचे दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीनुसार सादर करणे बाबत.

---oo---

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविणेत येते की, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर यांचे कार्यालयाकरीता १९० लिटर क्षमतेचा ब्रन्डेड कंपनीचा फ्रिज उदा.बजाज/व्हिडीओकॉन/एलजी/सॅमसंग/वरुफुल/केलव्हिनेटर यापैकी एक खरेदी करावयाचा आहे. त्याकरीता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरचे पत्र या कार्यालयाचे बेबसाईडवर अपलोड करण्यात आले आहे. तरी अधिकृत पुरवठादार / वितरक/मेसर्स/दुकानदार यांनी आपले दोन लिफाफा पध्दातीनुसार दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत पत्र निर्गमीत दिनांकापासून ०७ दिवसाचे आंत (शासकीय सुटटी वगळून) सादर करावयाची आहेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकाचाच विचार करण्यात येईल याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

पहिला लिफाफा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र -१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र -२) असे दोन लिफाफा या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहेत. **तांत्रिक लिफाफयामध्ये खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे**. खालील प्रमाणे कागदपत्रे सादर न केल्यास सदर प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१) पुरवठादाराचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र

२) पॅन कार्ड ची झेरॉक्स प्रत

३) जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत

४) अधिकृत विक्रेते असल्याबाबत कंपनीचे पत्र

**तांत्रिक लिफाफामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दरपत्रके उघडण्यापुर्वि सुचीत करण्यात येईल.**

(पोलीस आयुक्त,यांचे मान्यतेने)

Raut

पोलीस आयुक्त,अमरावती
यांचे करीता.

**प्रति,**

१) ----------------------------------------------------------
२) ----------------------------------------------------------
३) ----------------------------------------------------------

**प्रत,**

सपोनि सायबर सेल, अमरावती शहर.

१/- सदरचे पत्र या कार्यालयाचे अधिकृत बेबसाईडवर न चुकता आजच अपलोड करावे हि विनंती. जेणे करून ईच्छूक वितरक/दुकानदार/मेसर्स/पुरवठादार हे वेळेच्या आंत दरपत्रके कार्यालयास सादर करतील.